




दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १९४ ●सोमवार,दि.१३ ऑक्टोबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955


# आ. संदीप क्षीरसागर यांच्या पाठपुराव्याला यश

## शहरातील बायपास वळणावर दोन पुलांची बांधणी आणि स्लिप सर्विस रस्ता जोडणीच्या कामाला सुरुवात



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातून जात असलेल्या आणि उत्तर दक्षिण जोडणारा धुळे सोलापुर महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. यात जड वाहतकीचे प्रमाण देखील जास्त असते. धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर बायपास रस्त्यावरील शहरात वळणावर नेहमी अपघात होत होते. यामुळे संभाव्य अपघात टळले पाहिजेत आणि नागरिकांचे जीव वाचले पाहिजेत त्यामुळे या वळणावर पुलांची बांधणी आणि स्लिप सर्विस रस्त्याची जोडणी अत्यंत महत्त्वाची होती. त्या दोन्ही ठिकाणी पुलांची बांधणी व १२ किलोमीटर च्या रस्त्यावर स्लिप सर्व्हिस रस्ता जोडणीच्या कामाला प्रत्यक्षात सुरूवात झाली. या कामासाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी केंद्रीय रस्ते विकासमंत्री नितीन गडकरी

▶▶ उर्वरित पान २ वर

### आ.संदीप भैया आणि सय्यद सलीम यांनी खंडपीठात पिटीशन केली होती दाखल

आ.संदिप क्षीरसागर व माजी आमदार सय्यद सलीम यांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये यासंदर्भात पिटीशन दाखल केली होती.संदीप क्षीरसागर यांनी या कामाच्या मंजुरीची शिफारस राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावी अशी वारंवार मागणी केली होती.तसेच माजी आ.सय्यद सलीम यांनी दोन्ही उड्डाणपूल आणि स्लिप सर्विस रोड मंजुरीसाठी मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात याचिका क्रमांक ११७६/२०२४ व पीटिशन क्रमांक ८८०८/२०२४ दाखल केली होती. याठिकाणी होत असलेले अपघात बघता आणि सुरक्षेच्या प्रश्नांची गंभीर दखल घेत डिसेंबर २०२४ मध्ये तिन्ही कामांना मंजुरी द्या असे निर्देश दिले होते.त्यांच्या या निर्णयाने बायपास वरील सुरक्षेचा प्रश्न मार्गी लागणार असून आ.संदीप क्षीरसागर आणि माजी आ.सय्यद सलीम यांच्या प्रयत्नांना यश आले आहे.



# खोक्या उर्फ सतीश भोसलेच्या कुटुंबावर जीवघेणा हल्ला

## मध्यरात्री १५ जणांकडून दांडके अन् कोयत्याने मारहाण, चार महिला गंभीर जखमी

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील शिरूर तालुक्यात खळबळजनक प्रकार समोर आला आहे. सतीश उर्फ खोक्या भोसलेच्या कुटुंबावर मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात टोळक्याने प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात चार महिला गंभीर जखमी झाल्या असून, एका महिलाची प्रकृती अत्यवस्थ असल्याची माहिती समोर आली आहे. ही धक्कादायक घटना शिरूर तालुक्यातील तहसील कार्यालयाजवळील गायरान वस्तीमध्ये घडली. मध्यरात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास १० ते १५ जणांच्या टोळक्याने अचानक हल्ला चढवला. टोळक्याच्या हातात दांडगे, कोयते, कुऱ्हाडी होत्या आणि त्यांनी कुटुंबातील महिलांवर अमानुष हल्ला चढवला. महिलांनी जीव वाचवण्यासाठी आरडाओरडा केला, मदतीसाठी किंकाळ्या फोडल्या, पण टोळक्याला कोणताही पाझर फुटला नाही. थेट डोक्यावर, पाठीत आणि पायांवर वार करण्यात आले. या मारहाणीत सर्व

▶▶ उर्वरित पान २ वर




# बांधकाम कामगार कार्यालय आहे की, लुटारुचा अड्डा ? पाच पांडव करोडपती

● कामगार कल्याण अधिकारी, कर्मचारी व खाजगी एजंट मालामाल !
● बोगस बांधकाम कामगार दाखवून शासनाची लाखोंची फसवणूक

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी राज्य सरकारकडून अनेक योजना राबवल्या जात आहेत.परंतु या योजनेचा खरा लाभ मात्र बोगस कामगाराला होत असल्याचे चित्र सध्या बीड जिल्ह्यात दिसून येत आहे. बीड मधील काही खाजगी एजंट व बांधकाम कामगार कार्यालयातील काही कर्मचारी कामगार कल्याण अधिकारी यांची मिलीभगत असून पैसा शासनाच्या निधीवर डल्ला मरत लुटण्याच काम करत आहे. गोरगरिबांची तोंड मारताना कुठलाही अपराधीपणाचा लवलेश देखील चेहऱ्यावर दिसत नाही.या कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कोट्यावधीचं घबाड बुडाखाली दाबलं असल्याची माहिती मिळत आहे. बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी अनेक योजना शासनामार्फत राबवल्या जात आहेत. पण याची फळ कामगारांना कमी आणि बोगस लाभार्थ्यांना जास्त मिळत आहे. कामगार कल्याण

▶▶ उर्वरित पान २ वर



# एकनाथ शिंदे, डॉ श्रीकांत शिंदेंचा पूरग्रस्तांसाठी महत्वाचा उपक्रम

## शिवसेना डॉक्टर सेलच्या शिबिरातून शेकडो बीड ग्रामस्थांना मदत!

● मानवतेची सेवा हाच एकनाथ शिंदेंचा धर्म : जगताप, मुळूक, गलधर
● बीड जिल्ह्यात पूरग्रस्त भागात शिवसेना डॉक्टर सेलच्या मोफत आरोग्य व पशुवैद्यकीय शिबिराचे यशस्वी आयोजन



**बीड । प्रतिनिधी**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंदजी दिघे साहेब यांच्या प्रेरणेने तसेच महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यातील पूरग्रस्त भागात मोफत वैद्यकीय आणि पशुवैद्यकीय मदत शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. गेवराई तालुक्यातील गोगलगाव, गंगावाडी, बोरगाव, पांढरी, मिरगाव, माळस, पिपळगाव, सावळेश्वर, नागझरी आणि खाम गाव या गावांमध्ये आलेल्या पुरामुळे ग्रामस्थांना मोठ्या प्रमाणात अडचणींना सामोरे जावे लागले. या वाईट

▶▶ उर्वरित पान २ वर

# पंचायत समित्यांमधील अनुसूचित जाती आरक्षण निश्चित




**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हापरिषदेतील अनुसूचित जातींसाठी राखीव गट निश्चित झाल्यानंतर आता ११ पंचायत समित्यांमधील अनुसूचित जातींसाठी राखून ठेवावयाच्या गणांची देखील अधिसूचना काढण्यात आली आहे. प्रत्येक पंचायत समितीला अनुसूचित जातींसाठी देय असलेल्या जागांच्या प्रमाणात लोकसंख्येच्या प्रमाणानुसार अनुसूचित जातींसाठीचे पंचायत समिती गण अधिसूचित करण्यात आले आहेत. बीड जिल्ह्यातील जिल्हापरिषद आणि पंचायत समित्यांच्या गट आणि गणांची आरक्षण सोडत सोममवारी (दि. १३) होणार आहे. त्याचा पहिला टप्पा म्हणून अनुसूचित जाती आणि जमातींसाठीचे गट गण अधिसूचित करण्यास विभागीय आयुक्तांनी मंजुरी दिली आहे. बीड जिल्हापरिषदेत अनुसूचित जातीसाठी ८ गट राखीव असणार आहेत

▶▶ उर्वरित पान २ वर

# गेवराईजवळ अवैध वाळू करणारा हायवा वाहतूक शाखेने पकडला

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात बाळू बंदी असताना सुद्धा चोरीची वाळू वाहतूक सुरूच आहे दिनांक ११ऑक्टोबर रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास वाहतूक शाखा तर्फे पेट्रोलिंग करत असताना गेवराई च्या पुढे तलवाडा फाटा येथे नायरा पेट्रोल पंपासमोर एक हायवा येत असताना दिसून आले तयास थांबऊन तपासण्यात आले त्या मध्ये अंदाजे पाच ब्रास वाळू असल्याने त्यास रॉयल्टी बाबत विचारणा केली असता रॉयल्टी नसल्याचे दिसून आले चालका जवळ अधिक माहिती विचारली असता त्याने सदरील गोदाकाठी असलेल्या हिंगणगाव मधून चोरून आल्याचे कबूल केले असता त्यास ताब्यात घेऊन हायवा क्रमांक एम एच २३ टी २२२२ जप्त करून

▶▶ उर्वरित पान २ वर















# दीपावलीच्या तेजाला फटाक्यांची काजळी !

गेल्या काही वर्षांपासून दिवाळीनिमित्त एवढ्या प्रचंड प्रमाणात फटाके फोडले जातात कि फटाके हीच दिवाळीची खरी ओळख आहे की काय असा प्रश्न पडतो. वसुबारस, धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा, यमद्वितीया म्हणजेच भाऊबीज अशी सहा दिवसांची दिवाळी. या प्रत्येक दिवसाचे वेगळे महत्व आहे. त्या प्रत्येक दिवसाला वेगळा इतिहास आहे आणि त्या दिवशीचा सण कसा साजरा करावा यामागील शास्त्रही ठरलेले आहे. अर्थात राज्यपरत्वे, स्थानपरत्वे या सणांच्या मागील वेगवेगळ्या कथा आणि इतिहास ऐकायला मिळतात. मात्र संपूर्ण भारतभरात उत्साहाने साजरी होणाऱ्या दिवाळीतील सामायिक बाब म्हणजे या दिवसांत सर्वत्र मोठ्या प्रमाणात दिवे लावले जातात. दीपावली शब्दाचाच अर्थ दीप +आवली अर्थात दिव्यांची रांग असा आहे. दीपावली हा दिव्यांचा उत्सव आहे. तिमिराकडून तेजाकडे म्हणजेच अंधाराकडून प्रकाशाकडे नेण्याची शिकवण दीप आपल्याला देतो. कोणी कितीही गरीब असला तरी त्याच्या घरी दिवाळी दरवर्षी साजरी होतेच. दिवाळीच्या निमित्ताने घर आणि सभोवतालचा परिसर स्वच्छ केला जातो, घराला रंगरंगोटी केली जाते, या सहा दिवसांत दाराबाहेर आकाशकंदील लावला जातो. दाराजवळ सुबक रांगोळी काढली जाते. दारात आणि तुळशीजवळ तेलाच्या पणत्या लावल्या जातात. घरोघरी लाडू, चकली कारंज्यांचा फराळ बनवला जातो. आप्तेष्टांना, मित्र मंडळींना दिवाळीच्या आणि पाडव्याच्या शुभेच्छा दिल्या जातात. हीच दिवाळी साजरी करण्याची परंपरागत पद्धत. या सर्वांत फटाके वाजवणे कुठेच बसत नाही, मग ही प्रथा दिवाळीत शिरली तरी कुठून ? एरव्ही लग्न समारंभ, उदघाटनाच्या कार्यक्रमांत, मिरवणुकांमध्ये आणि राजकीय सभांच्या वेळी आतषबाजी म्हणून फटाके फोडणे एकवेळ मान्य; मात्र दिवाळीसारख्या धार्मिक



सणाचा आणि फटाके फोडण्याचा काय संबंध ?

सुमारे २२०० वर्षांपूर्वी चीनच्या लुईयाँग प्रांतात फटाके फोडल्याचा संदर्भ आढळतो. आगपेटीच्या काडीप्रमाणे काठ्यांच्या टोकाला ज्वालाग्राही पदार्थाची गाठ बनवली जाई आणि ही गाठ आगीत धरल्यावर तिचा आवाज येत असे. ही आतषबाजी पुढे लग्नसमारंभांना होऊ लागली. १९२३ मध्ये भारतातील कोलकात्यामध्ये नाडर बंधूंनी आगपेटीच्या कारखान्यांमध्ये सर्वप्रथम फटाक्यांची निर्मिती केली. १९४० मध्ये तामिळनाडूतील शिवकाशी येथे फटाक्यांचा पहिला कारखाना सुरु झाला. तेव्हापासून आजतागायत शिवकाशी मध्ये अविरतपणे फटाक्यांची निर्मिती सुरु आहे. आजमितीला शिवकाशी येथे फटाक्यांचे मोठमोठे कारखाने तयार झाले आहेत. येथून संपूर्ण भारतात फटाके पुरवले जातात. शिवकाशी येथे तयार केल्या जाणाऱ्या फटाक्यांना भारतभरातून विशेष मागणी आहे. दिवाळी सणाला सहस्रो वर्षांचा इतिहास आहे आणि फटाके बनवणारा पहिला कारखाना भारतात ८३ वर्षांपूर्वी तयार झाला आहे याचाच अर्थ दिवाळीत फटाके फोडण्याच्या प्रथेला कोणताही शास्त्रीय आधार नाही. पूर्वीचे राजे महाराजे आनंदाच्या क्षणी आतषबाजी करत असल्याचे दाखले इतिहासात सापडतात. ही आतषबाजी आता फटाक्यांच्या रूपाने दिवाळीत सर्वत्र होऊ लागली आहे. स्वातंत्र्य दिनाच्या किंवा सांस्कृतिक आणि सार्वजनिक कार्यक्रमांत आतषबाजी करण्याची प्रथा पाश्चात्य देशांमध्ये सुद्धा आहे, मात्र ही आतषबाजी केवळ शोभेच्या फटाक्यांपुरती सीमित असते. आपल्याकडे मात्र शोभेपेक्षा अधिकाधिक आवाजाच्या फटाक्यांचीच स्पर्धा प्रतिवर्षी पाहायला मिळते. दिवाळीच्या तोंडावर दरवर्षी प्रशासनाकडून फटाके फोडण्यासंदर्भातील नियमावली जाहीर केली जाते ज्यामध्ये आवाजाच्या मर्यादेपासून फटाके फोडण्यासाठीची निषध्द क्षेत्रेही नमूद केलेली असतात. मात्र शहरासारख्या ठिकाणी या नियमावलीला सर्रासपणे हरताळ फासला जातो. सर्वत्रच फटाक्यांची आतषबाजी सुरु असल्याने कारवाई तरी कोणावर करणार, असा यक्ष प्रश्न प्रशासनासमोर असतो. आजमितीला लोकसंख्येत अव्वल असलेल्या भारतातील बराचसा भाग दारिद्र्यरेषेखाली जीवन कंठत आहे, ज्यांना दोन वेळेचे पोटभर अन्न मिळणेही दुरापास्त आहे. देशातील कित्येक गावे कुपोषित आहेत. दिवसागणिक वाढत जाणाऱ्या महागाईने सर्वसामान्यांचे जगणे मुश्किल केले आहे. अशा परिस्थितीत केवळ क्षणिक मौजेखातर फटाक्यांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची राख-रांगोळी करणे कितपत योग्य आहे ? शिवकाशी हे ठिकाण अव्वल दर्जाचे फटाके बनविण्यासाठी देशभर प्रसिद्ध आहे; मात्र याच शिवकाशीमध्ये दरवर्षी फटाक्यांच्या कारखान्यांना आगी लागून जीवित आणि वित्तहानी होण्याच्या अनेक घटना घडत असतात. या कारखान्यांतील दारूच्या प्रभावामुळे कारखान्यांत काम करणाऱ्या कितीतरी लहान मुलांना, कामगारांना असाध्य आजार जडतात, कायमचे अपंगत्व येते. याशिवाय दिवाळीच्या दरम्यान फटाक्यांच्या गोदामांना, दुकानांना आगी लागल्याच्या अनेक बातम्या दरवर्षी वाचनात येतात. फटाके फोडताना कित्येक जण भाजतात, जळके फटाके इतरत्र उडाल्यामुळे आगी लागण्याच्या घटना घडतात ज्यामध्ये दरवर्षी शेकडो जण मृत्युमुखी पडतात तर हजारो जण जखमी होतात. याकाळात अग्निशमन दलावर प्रचंड ताण असतो. याशिवाय केवळ फटाक्यांच्या कारणावरून अनेक ठिकाणी भांडणे, मारामाऱ्या होतात त्या वेगळ्या.

कानठळ्या बसवणाऱ्या आवाजाच्या फटाक्यांमुळे इमारतींना तडे जातात, खिडक्यांच्या काचा फुटतात तसेच सिलींगचे प्लास्टरिंग सैल होण्याचाही धोका असतो. विजेचे काचेचे बल्बही फटाक्यांच्या आवाजामुळे फुटतात. दिवाळीत फोडल्या जाणाऱ्या फटाक्यांमुळे लोकांच्या आरोग्यावर सर्वाधिक परिणाम होतो. कानठळ्या बसवणार्या फटाक्यांमुळे कायमचा बहिरेपणा येऊ शकतो. अतिआवाजामुळे कान बधीर होतात. श्रवणयंत्रणातील पेशी एकदा मृत झाल्या की, त्या पुन्हा नव्याने निर्माण होत नाहीत. गर्भवती महिला, दीर्घ आजाराने ग्रस्त असलेले रुग्ण आणि नवजात बालके यांच्यावर फटाक्यांच्या आवाजाचा भयंकर परिणाम होतो. मायग्रेन, रक्तदाब आणि हृदयविकाराचा त्रास असणाऱ्या रुग्णांच्या त्रासामध्ये फटाक्यांच्या अतिआवाजामुळे अधिक वाढ होण्याची शक्यता असते. फटाके फोडल्यावर निर्माण होणाऱ्या विषारी धुरामुळे प्रचंड वायुप्रदूषण होते ज्याचा त्रास लहान मुलांसह अस्थमा आणि फुफुसाचा आजार असलेल्यांना अधिक होत असतो. अमेरिकेसारख्या विकसित देशात मानवी आरोग्यावर परिणाम करणाऱ्या फटाक्यांवर बंदी घालण्यात आली आहे. न्यूझीलंड, इटली, फ्रान्स, बेल्जियम या देशांत केवळ प्रौढ व्यक्तींनाच फटाके विकत घेण्यास आणि फोडण्यास अनुमती आहे. आपल्याकडे मात्र असे कोणतेही धोरण प्रशासनाने आखलेले नाही. उलट इथे घरातील प्रौढच फटाके आणून ती लहानांना फोडण्यासाठी उपलब्ध करून देतात. दिवाळीतील लक्ष्मीपूजनाच्या दिवशी घराघरात श्री महालक्ष्मी आणि श्री कुबेराचे पूजन केले जाते. लक्ष्मी ही धनाची देवता आहे तर कुबेर हा धनसंचयाचा देव आहे. एकीकडे योग्य मार्गाने धन प्राप्ती होण्यासाठी देवी लक्ष्मीची आणि आलेले धन टिकून राहावे यासाठी कुबेराची पूजा करायची आणि दुसरीकडे लक्ष्मीच्या कृपेने मिळालेले धन फटाक्यांच्या माध्यमातून विनाकारण व्यय करायचे हा विरोधाभास नव्हे काय ? प्राचीन युगात राक्षस नागरिकांना त्रास देऊन असुरी आनंद मिळवायचे. आताच्या काळी फटाके फोडून इतरांना त्रास देऊन साजरा केल्या जाणाऱ्या आनंदाला असुरी आनंदच म्हणावे लागेल. आपल्याला एखादा आजार झाला कि त्यावर वेळीच उपचार घेऊन आपण त्याचे निराकरण करतो. फटाक्यांच्या रूपाने आपल्या हिंदू संस्कृतीतील दीपावली सारख्या व्यापक आणि सात्विक सणाला एकप्रकारचा आजारच जडला आहे. तो दूर करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. दीपावलीच्या तेजाला लागलेली फटाक्यांची काजळी दूर करून तिला पुनर्रतेज प्राप्त करून द्यायचे असेल, तर सुरुवात आपल्या घरापासूनच करावी लागेल.

– जगन घाणेकर, मुंबई

◆ पान १ वरून पुढे...

## आ. संदीप क्षीरसागर...

यांच्याकडे पाठपुरावा केला होता. बीड विधानसभेचे आ.संदीप भैया क्षीरसागर यांनी या सुरू झालेल्या कामाच्या ठिकाणी जाऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी कामासंदर्भात संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना योग्य त्या सूचना करत व सुरू झालेले काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी सूचना दिल्या.

## खोक्या उर्फ सतीश...

महिला रक्तबंबाळ झाल्या. जखमी महिलांनी कसाबसा पोलीस ठाण्याचा रस्ता धरला आणि शिरूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तातडीने कारवाई करत जखमींना बीडच्या शासकीय जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केलं असून सध्या तिथेच त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या हल्लयात चार महिला गंभीर जखमी झाल्या असून, एका महिलाची प्रकृती अत्यवस्थ असल्याची माहिती समोर आली आहे. प्राथमिक माहितीनुसार, अनेक वेळा सांगून देखील या ठिकाणी का राहता? असे म्हणत टोळक्याने सतीश भोसलेच्या कुटुंबाला जबर मारहाण केल्याचे समजते. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. शिरूर पोलीस या संपूर्ण प्रकरणाचा तपास करत आहेत. आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. दरम्यान, सतीश भोसले उर्फ खोक्या भाई हा शिरूर कासार तालुक्यातील झापेवाडीचा रहिवासी आहे. मागील पाच वर्षांपासून तो राजकारणात सक्रिय होता. भाजप आमदार सुरेश धस यांचा जवळचा सहकारी अशी त्याची ओळख आहे. सतीश भोसलेवर अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. काही महिन्यांपूर्वी समाज माध्यमांवर दहशत पसरवणारे त्याचे व्हिडिओ व्हायरल झाले होते. वनविभागाची कारवाई व घरात सापडलेल्या ऐवजामुळे बीडमध्ये व राज्यभर खोक्या भाईची एकच चर्चा होती. बुलढाणा जिल्ह्यातील कैलास वाघ या तरुणाला बॅटने बेदम मारहाण केलेल्या प्रकरणात सतीश उर्फ खोक्या भोसलेला बीड न्यायालयाने नुकताच जामीन मंजूर केलाय.

## बांधकाम कामगार...

अधिकाऱ्यानी कॉन्ट्रॅक्ट बेस वर कर्मचार नेमणूक कोणत्या नियमाखाली केली आहे का फक्त वसुलीसाठी असा देखील प्रश्न पडत आहे. कल्याणकारी योजनांचा फायदा बांधकाम मजुरांना होण्याऐवजी एजंटासह समन्वयकलाच जास्त होत असल्याचं दिसत आहे.त्या नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यास तुटपुंजी वेतन मिळत असताना कोट्यावधी रुपयांचे बंगले बांधकाम कामगारांचं शोषण करून उभा केल आहे.यांने जमवलेल्या मायेचा स्त्रोत हा गुढ आहे. ही माया गोळा करताना अनेक ग्रामपंचायतींचे बनावट सही शिक्के तयार करून घेतले गेले. या सही शिक्यांचा भरमसाठ वापर करत बनावट कागदपत्र तयार केली. यामध्ये शेकडो लोक बांधकाम मजुरांना मिळणाऱ्या योजनांचा बोगस लाभ घेत आहेत.धन दांडग्यांच्या घरात देखील कामगारांना वाटप केलेल्या भांड्याचे किट या माध्यमातून गेले. खरा गरजवंत बांधकाम कामगार मात्र यांच्या या काळ्या कारणाम्यामूळे योजना पासून कोसो दूर राहू लागला आहे. तीच स्थिती सध्या कामगारांच्या सुरू असलेल्या प्रशिक्षणाची आहे. फोटो काढायचं प्रशिक्षण दिले हे दाखवायचं. त्यातून मिळणारं ५ हजार रुपयाच अनुदान खिशात घालायचं. यामध्ये देखील सगळाच बोगस प्रकार सध्या तरी घडत आहे. याच कमाईचा काही भाग कामगार कल्याण अधिकारी यांच्यासह राजकीय व्यक्तींना देखील पोहोच होत असल्याने या विरोधात कोणी आवाज उठवायला किंवा जाब विचारला धजावत नाही. बांधकाम कामगारांशी निगडित हा विषय असल्याने माध्यमही याकडे फारसं लक्ष देत नाही. याच बोगसगिरीचा भांडाफोड गेवराई मध्ये झाला होता. याच्या चौकशीचा ससेमिरा काही जणांच्या पाठीशी लागला आहे. बीडचे हा महानग मात्र महागडा फ्लॅट, ग्रामीण भागात शेती, स्वतःच्या नावावर चार चाकी गाडी घेऊन मजा मारत असल्याचं पाहायला मिळत आहे.या विरोधात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन कारवाई करणार का?त्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संपत्तीची चौकशी करणार का? बोगस बांधकाम कामगार शोधून त्यांच्यावर कारवाई करणार का? गोरगरीब बांधकाम कामगारांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी तरी पदाच्या अधिकाराचा वापर जिल्हाधिकारी करणार का? असा सवाल सर्वसामान्य नागरिक करत आहेत. बांधकाम कामगार उपाशी अन् बोगस कामगार असेच म्हणावे लागेल. बीड जिल्ह्यात बांधकाम कामगार कर्मचारी अधिकारी व खाजगी एजंटाची चौकशी होणार का? गोरगरिबाच्या खाऱ्या लाभार्थ्यांच्या योजना लुटणाऱ्या बोगस कामगारावर देखील कारवाई होणार का?असा प्रश्न सध्या जनतेतून विचारले जात आहेत. बीड जिल्हाधिकाऱ्यांनी बांधकाम कार्यालयातील सर्वच कर्मचारी अधिकाऱ्याची चौकशी करून जनतेसमोर पारदर्शकता आणावी व दोशी आढळल्यास त्यावर कारवाई करावी अशी देखील मागणी होत आहे.

## एकनाथ शिंदे, ....

परिस्थितीत, दि. १२ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ७.०० वाजल्यापासून रात्री ८.०० वाजेपर्यंत शिवसेना डॉक्टर सेलच्या टीमने गावोगावी जाऊन नागरिकांची आरोग्य तपासणी केली, औषधे वाटप केली आणि तातडीची मदत पोहोचवली. या सेवाकार्यात डॉ. धनंजय पडवळ (प्रदेशाध्यक्ष, शिवसेना डॉक्टर सेल), डॉ. करणसिंह गाडे (प्रदेशाध्यक्ष, आयुष होमिओपॅथिक विंग), डॉ. अमोल आंबेकर (महाराष्ट्र प्रदेश संघटक), डॉ. उमेश जाधव (मराठवाडा विभाग प्रमुख), डॉ. अनुराधा पेडणेकर, डॉ. किरण वनवे, डॉ. मंगेश बाजड पाटील, डॉ. विश्वंभर देशमुख, डॉ. काकासाहेब गंडाळ, डॉ. गौतम सोनावणे, डॉ. सचिन पाचखांडे, डॉ. राखी कपूर, डॉ. प्रतिभा काळे, डॉ. समिक्षा सेठ, डॉ. मेघा जोशी, डॉ. संदीप सालपे, डॉ. ब्रम्हदेव खिलारे, डॉ. सत्यम चौधरे, डॉ. गणेश शिंदे, डॉ. प्रवीण पवार, डॉ. ज्ञानेश्वर ढास यांच्यासह अनेक डॉक्टरांनी सहभाग घेतला होता. त्यांच्या कार्याची बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने विशेष दखल घेऊन त्यांचा शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांनी सत्कार करून आभार व्यक्त केले. तसेच महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते सन्माननीय एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांचा मानवतेची सेवा हाच धर्म असल्यामुळे तळागाळातील लोकांना त्यांनी राबवलेल्या अभिनव उपक्रमांचा फायदा होतो आहे, अशी भावना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केली. अँड नारायण शिंदे उप जिल्हाप्रमुख, उद्धव मडके तालुका प्रमुख, नवनाथजी गवते विधानसभा प्रमुख, मुकेश अण्णा महाजन शहर प्रमुख, बबन मोघे युवा सेना तालुका प्रमुख, बाळासाहेब खेडकर ओबीसी तालुकाप्रमुख, संतोष तपसे, डाके मामा, भागवतराव डाके, ऋषिकेश उधे, विजय पवार, नागराज तलवाडे, अंकुश गिरी, शेख जावेद, अशोक कदम इतर सर्व गावकरी आणि गेवराई तालुक्यातील शिवसैनिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांच्या उत्कृष्ट नियोजनाखाली शिबिर यशस्वी पार पडले !

शिवसेना जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांच्या उत्कृष्ट नियोजनाखाली शिबिर यशस्वी झाले. त्यांनी गावोगावी पदाधिकारी आणि शिवसैनिकांच्या माध्यमातून शिबिराची माहिती ग्रामस्थांपर्यंत पोहोचवली आणि शिवसेना डॉक्टर सेल टीमला आवश्यक सर्व सहकार्य केले. शिवसेना डॉक्टर सेलच्या या उपक्रमामुळे अनेक नागरिकांना तातडीची वैद्यकीय मदत मिळाली आणि पशुधनाचीही काळजी घेण्यात आली, ज्यामुळे शिबिराने व्यापक प्रमाणात लाभार्थींना सेवा दिली.

## पंचायत समित्यांमधील...

तर ११ पंचायत समित्यांममध्ये देखील वेगवेगळ्या संख्येने अनुसूचित जातींसाठी गण आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. त्याला विभातीय आयुयक्तानी मंजुरी दिल्यानंतर आता सोमवारी अनुसूचित जाती महिला, ओबीसी, ओबीसी महिला आणि सर्वसाधारण महिला असे आरक्षण सोडत पद्धतीने काढण्यात येणार आहे. अनुसूचित जातींसाठी आरक्षित गट : तालखेड, केसापुरी, तेलगाव, होळ, पाटोदा (म), पिंप्री (बु), मोहा, जिरेवाडी पंचायत समित्यांमधील अनुसूचित जातींसाठी राखीव गण- तालुका बीड (२) , गण, बहिरवाडी, नाळवंडी, गेवराई (२ ) जातेगाव, गढी, माजलगाव (२) सावरगाव, केसापुरी ,वडवणी ( १ ), चिखलबीड

## गेवराईजवळ अवैध...

गेवराई पोलीस ठाण्यात जमा करून चालक अक्षय महादेव इंबडे वय २७ वर्ष राहणार बागपिंपडगाव तालुका गेवराई यास गेवराई पोलिसांच्या ताब्यात देण्यात करण्यात आले सदरील कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावंत व अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक सुभाष सानप यांनी केली असून या कारवाईत सिद्धांत गोरे व चालक दत्ता कदम , अजिनाथ मुंडे यांनी केले असून अजिननाथ मुंडे यांच्या फिर्यादीवरून चालक अक्षय महादेव इंबडे यांच्यावर ३०३ (२) भारतीय न्याय संहिता प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे

◆ पान ४ वरून पुढे...

## जयभवानीच्या कार्यक्षेत्रातील...

हजार रुपयांचे पारितोषिक चेअरमन अमरसिंह पंडित यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी पुढे बोलताना अमरसिंह पंडित म्हणाले की, गेवराई तालुक्यात पुरामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालेले आहे त्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी मराठवाड्यातील सर्व नेत्यांना सोबत घेऊन प्रयत्न करत आहे. कारखान्याच्या माध्यमातून डिसलेरी ११ महिने कशी चालू ठेवता येईल यासाठी प्रयत्न चालू असून शेतकऱ्यांनी उसासोबतच आता फळबागा, रेशीम आधी उत्पादनाला हात घातला पाहिजे. रेशीमचे उत्पादन गेवराईत मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे रेशीमवर प्रक्रिया करणारा उद्योग सुरू करणार असल्याचे सांगून कारखान्यातील कर्मचारी आणि कामगारांनी अतिशय प्रामाणिकपणे काम केल्यामुळे जयभवानीची कार्यक्षमता वाढली आहे. त्यामुळे कामगारांच्या पगारात सप्टेंबर २०२५ पासून १५ टक्के वाढ करणार असल्याचेही त्यांनी यावेळी जाहीर केले. कुठल्याही गटातटाचा विचार न करता जयभवानीच्या कार्यक्षेत्रातील नोंद झालेल्या शेतकऱ्यांचा ऊस शंभर टक्के उचलला जाईल असे सांगून बँका, कारखाना, शिक्षणसंस्था यात कोणीही राजकारण करू नये असे आवाहन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात कारखान्याचे जनरल मॅनेजर दत्तात्रय टेकाळे म्हणाले की, कारखाना कार्यक्षेत्रात १३ विभागामध्ये ३३ गट कार्यरत असून प्रत्येक विभागवाईज व गटवाईज ऊस जातनिहाय पंधरवाडा वाईज ऊस तोड वाहतूक कार्यक्रम राबविणार आहोत व त्यामध्ये सुधारित जातीच्या व परिपक्क उसाला प्राधान्य देवून तोडणी करणार आहोत त्यामुळे साखर उतारा वाढण्यास मदत होवून शेतकर्यांच्या ऊसाला चांगला दर देता येईल. कारखान्याकडे सद्यस्थितीत इतर बँकाकडील सर्व कर्ज निरंक होवून फक्त एम.ए.स.सी.बँकेडील कमी व्याज दराचे कर्ज वगळता कुठलेही कर्ज देय राहिलेले नाही, तसेच कारखान्याकडे कोणत्याही प्रकारची शासकीय देय बाकी राहिलेली नाही असेही ते यावेळी म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव चाटे यांनी केले. यावेळी यावेळी सर्व संचालक, विविध संस्थांचे पदाधिकारी तसेच कार्यकारी संचालक राजेंद्र खाडप, चिफ इंजिनिअर अशोक होके, चीफ इंजिनिअर ऋषिकेश देशमुख, प्रॉडक्शन मॅनेजर गजानन वाळके, मुख्य शेतकी अधिकारी सुदामराव पघळ, मुख्य लेखापाल सौरभ कुलकर्णी, बॉयलर इंजिनियर मदन अरबे, इन्स्ट्रुमेंट इंजिनियर ज्ञानेश्वर आघव, डिस्टलरी इनचार्ज राजेंद्र बडे, चीफ केमिस्ट श्रीमंत जाधव, सिव्हील इंजिनिअर भालचंद्र कुलकर्णी, सुरक्षा अधिकारी एस.एन.औटे, संगणक विभागाचे धनाजी भोसले, खरेदी विभागाचे सुशांत सोळंके, ऊस पुरवठा अधिकारी वच्छिष्ट कुटे, हेड टाईम किपर सचिन उधे, कार्यालयीन अधीक्षक गोविंद चव्हाण, स्टोअर किपर राजेंद्र ढेंगळे, उद्धव पारे, ऋषिकेश शिंदे, महेश गुंजाळ यांच्यासह कामगार, कर्मचारी, अधिकारी, सभासद, ऊस उत्पादक शेतकरी व ऊस तोडणी वाहतुक ठेकेदार, कार्यक्रमास उपस्थित होते.

## ज्या शेतकऱ्यांनी....

दोन्हीही गावातील शेकडो नागरीकांची मोठ्या संख्येने उपस्थितीती होती. परंपारीक शेतीत बदल करून कुठेतरी आता शाश्वत शेतीकडे वळण्याची गरज निर्माण झालेली आहे. सोयाबीन, कापूस, ऊस आदी पिके ही घ्यायची म्हणून शेतकरी घेतात, मात्र हिशोब केला तर त्यातून कवडीचेही उत्पन्न मिळत नाही. वर्षानुवर्षे तोट्यातील शेतकरी कर्जाच्या अगदी खाईत जात आहेत. त्यावर उपाय म्हणून केळी, अंबा, सिताफळ, तुती अशा पिकांकडे शेतकऱ्यांनी वळले पाहीजे. ग्लोबल विकास ट्रस्टकडून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना फळबाग लागवडीबाबत मोफत प्रशिक्षण देण्यात येते. आजघडीला जवळपास ३० हजार पेक्षा जास्त शेतकरी ग्लोबल विकास ट्रस्टसोबत जोडल्या गेलेले आहेत. त्या सर्व शेतकऱ्यांच्या कुटूंबाची अर्थव्यवस्था पूर्वीपेक्षा जास्त सुधारली असून, आज ते समाधानी जीवन जगत आहेत. येणाऱ्या काळात फळपिक लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना आवश्यक असलेली सर्वतोपरी मदत करण्याचा आमचा संकल्प असून, शेतकऱ्यांनी सिरसाळा येथील कृषीकूलमध्ये यावे. तेथील उपलब्ध सर्व बाबींचा अभ्यास करावा आणि येणाऱ्या काळात फायदा करून घ्यावा असे आवाहन ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांनी शेतकऱ्यांना केले आहे.

## 14 वर्षाच्या रितेश...

येथील आपला विद्यार्थी आहे असे समजून शिक्षकांनी आंबेजोगाई रुग्णालयामध्ये दाखल करेपर्यंत थोडीफार मदत करण्यात आली आता पुढील उपचारासाठी अंबाजोगाई शहरातील व परिसरातील स्वयंसेवी संस्था व दानशूर व्यक्तींनी पुढे येऊन या चौदा वर्षाच्या रितेश मारोती गवळीला वाचवण्यासाठी जी काही समाजामधून मदत करता येईल ती मदत करावी अशी कळकळीची विनंती रितेश गवळी यांची आई करत आहे. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ शाखा आंबेजोगाई च्या वतीने संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक अ.र. पटेल साहेब संतोष केंद्रे पत्रकार राम जोशी दिलीप अरसूळ मदत करण्यात आली.

## बीडच्या सिंदफना...

भाव वाटप कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी बोलताना क्लबचे सदस्यांनी तुमच्या दुःखामध्ये आम्ही सोबत आहोत, तुमचे दुःख पाहिल्यानंतर दिवाळी गोड व्हावी याकरता आम्ही हे फुल नाही फुलाची पाकळी म्हणून मदत करत आहोत ती गोड मानून घ्यावी. असे मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक आणि सूत्रसंचालन सुरेश जाधव यांनी केले. यावेळी शेतकऱ्यांना दिवाळीचा सण साजरा करता यावा यासाठी लागणारे किराणा डाळ तेल साखर तांदूळ यासह अन्य किराणातील साहित्य किट तब्बल वीस किलोची किट वाटप करण्यात आली .. यावेळी गावकऱ्यांनी क्लबचे आभार मानले.. सिंदफना नदीकाठच्या हिंगणी हवेली गावात नदीचे पाणी शाळेमध्ये गेल्याने अनेक शाळकरी विद्यार्थ्यांचे शालेय साहित्य भिजले होते त्यासाठी या क्लबने २५ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते शाहेद पटेल यांच्यासह जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी शिक्षक आणि गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सिंदफणा पब्लिक....

सविस्तर वृत्त असे की, विभागीय स्पर्धेत चौदा वर्षांखालील गटातील मुलांच्या ४१०० मीटर फ्रीस्टाइल रिले स्पर्धेत समर्थ गोळेकर, दक्षराज कटारे, आरव भुतडा, अथर्व दुबाळे आणि दीपक भोसले यांच्या संघाने सुवर्णपदक पटकावले. याच स्पर्धेत सतरा वर्षांखालील गटातील मुलींच्या संघात अक्षरा सोळंके, विशाखा सकराते, अनुष्का सोळंके आणि मानसी जगताप यांनी प्रथम क्रमांक मिळवला. तसेच ४१०० मीटर मिडले रिले स्पर्धेतही चौदा वर्षांखालील मुलांच्या गटात समर्थ गोळेकर, दक्षराज कटारे, आरव भुतडा, अथर्व दुबाळे आणि अभिनव राठोड यांनी तर सतरा वर्षांखालील मुलींच्या गटात अक्षरा सोळंके, विशाखा सकराते, अनुष्का सोळंके आणि मानसी जगताप यांनी सुवर्णपदके जिंकली. वैयक्तिक स्पर्धांमध्येही विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरी केली. सतरा वर्षांखालील मुलींच्या गटातील अक्षरा सोळंके यांनी ५० मीटर, १०० मीटर आणि २०० मीटर फ्रीस्टाइल या तिन्ही स्पर्धांमध्ये रजत पदके मिळवली. चौदा वर्षे वयोगटातील दक्षराज कटारे यांनी पन्नास मीटर बटरफ्लाय स्पर्धेत दुसरा क्रमांक पटकावला. वॉटर पोलो स्पर्धेतही शाळेच्या संघाने अंतिम सामन्यात देवगिरी महाविद्यालय विरुद्ध ४-३ गोल करून प्रथम स्थान मिळवून सुवर्णपदक जिंकले. एकोणीस वर्षाखालील वॉटर पोलो संघात अभिनव पाणजंजाळ (कर्णधार), आदित्य पाणजंजाळ, मनिष पारवे, कृष्णा डाके, दक्षराज कटारे, गणेश राऊत, समर्थ गोळेकर, अथर्व तौर, आरव भुतडा, राजवीर राठोड, तेजेस सुरवसे आणि अथर्व दुबाळे यांचा समावेश होता. या स्पर्धेच्या तयारीसाठी शाळेचे क्रीडा शिक्षक सचिन मंजुळे यांनी विशेष परिश्रम घेतले. यासाठी क्रीडा संचालक दीपक माने, क्रीडा शिक्षक पुरुषोत्तम सोळंके, सचिन मंजुळे व क्रीडा शिक्षिका वैशाली सोळंके यांनी सहकार्य केले. या यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष आमदार प्रकाश सोळंके, शाळेच्या सचिव मंगल सोळंके, समन्वयक नीला देशमुख, प्राचार्य अन्वर शेख, शैक्षणिक विभाग प्रमुख जीबी ऑगस्टन, सुनिता सुरवसे, धनंजय सोमवंशी, अर्चना जाधव, देवेंद्र सोळंके, प्रदीप बुरकुल, शाळेचे व्यवस्थापन, शिक्षक, पालक आणि खेळप्रेमी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. राज्यस्तरीय स्पर्धेतही हे जलतरणपटू उत्कृष्ट कामगिरी करून शाळेचे आणि विभागाचे नाव उज्ज्वल करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# सर्वोच्च न्यायालयातील हल्ल्यानंतरही सरन्यायाधीश गवई टीकेचे धनी का ?

# दलित समाजातील एक गट म्हणतो, "आरक्षण आर्थिक नव्हे..."

**नागपूर । प्रतिनिधी**

सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्यावर आक्षेपार्ह टिप्पणी केल्याच्या आरोपाखाली युट्यूबर अजीत भारती याला नोएडा सेक्टर ५८ पोलीस ठाण्यातील पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. पोलीस सध्या त्याची चौकशी करत आहेत. सरन्यायाधीशांवर न्यायालयात बूट फेकण्याचा प्रयत्न झाल्याच्या घटनेवर अजीत भारती याने वादग्रस्त व चिथावणीखोर वक्तव्य केलं होतं. अजीत भारती हा उजव्या विचारसरणीचा युट्यूबर बऱ्याचदा समाजमाध्यमांवरून भाजपाचा प्रचार करताना दिसतो. दलित समाजातील एका गटाकडूनही सरन्यायाधीशांवर झालेला हल्ल्यानंतर आरक्षणाच्या मुद्द्यावरून टीका होत आहे. काय आहे हे प्रकरण बघूया.

सरन्यायाधीश गवई दलित समाजातून येतात. त्यांनी सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाच्या निर्णयावर आर्थिक आधारावर आरक्षण हवे असे मत नोंदवले होते. मात्र हिंदू विरोधी म्हणून गवई यांच्यावर हल्ला करण्यात आला. त्यामुळे एका पिढीनंतरही आरक्षणाची गरज का असते ?, आरक्षण आर्थिक आधारावर का नको हे आता समजले का? असा प्रश्न विचारणारे कार्टून दलित समाजातील काही संघटनांकडून प्रसारित केले जात आहे.

सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाच्या उपवर्गीकरणाबाबत मागील वर्षी दिलेला निर्णय भारतीय सामाजिक न्याय व्यवस्थेत एक ऐतिहासिक टप्पा मानला जातो. पंजाब राज्य वि. देविंदर सिंह या प्रकरणावर निर्णय देण्यासाठी ७ न्यायाधीशांचे खंडपीठ बसले होते. तत्कालीन सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील या खंडपीठात सध्या देशाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई देखील सहभागी होते.

सरन्यायाधीश भूषण गवई म्हणाले, माझ्या उपवर्गीकरणाच्या निर्णयावर मला मोठ्या प्रमाणावर टीका सहन करावी लागली. माझ्याच समाजातील लोकांनीही टीका केली. मात्र, न्यायालयीन निर्णय घेताना लोकांच्या अपेक्षा किंवा इच्छांवर नाही, तर कायद्याच्या समजुतीवर आणि माझ्या अंतःकरणावर आधारित राहावे लागते, असा माझा नेहमी विश्वास आहे.

ऑगस्ट २०२४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायाधीशांच्या संविधान पीठाने बहुमताने दिलेल्या ऐतिहासिक निकालात अनुसूचित जाती एकसमान सामाजिक गट नसून राज्यांना त्यांच्या उपविभागांचे आरक्षणासाठी वर्गीकरण करण्याचा अधिकार आहे, असे स्पष्ट केले होते.

## पंकजाताईंच्या नेतृत्वाखाली बीड भाजप सज्ज

### नगराध्यक्ष पदावर भगवा लावण्याचा संकल्प : गणेश लांडे, भाजपा बीड जिल्हा सरचिटणीस

**बीड । प्रतिनिधी**



येणाऱ्या नगरपरिषद निवडणुकीत बीडचा नगराध्यक्ष हा भाजपचाच होणार, असा ठाम निर्धार भाजप कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या नगरपरिषद निवडणुकीच्या आरक्षण सोडतीनुसार बीड शहरासाठी अनुसूचित जाती प्रवर्गासाठी आरक्षण घोषित झाले आहे. विशेष म्हणजे, बीड नगरपरिषदेच्या इतिहासात हे पहिल्यांदाच अनुसूचित जातीसाठी आरक्षण जाहीर झाले असून या पार्श्वभूमीवर शहरात राजकीय हालचालींना वेग आला आहे. या नव्या राजकीय समीकरणाच्या पार्श्वभूमीवर ना. मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली भाजपने जोरदार तयारीला प्रारंभ केला आहे. पंकजाताईंच्या मार्गदर्शनाखाली पक्षाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि जनतेतील समर्थक एकजूट होऊन कामाला लागले असून, यावेळी नगराध्यक्ष हा भाजपचाच होणार असा नारा देत पक्ष संघटन सज्ज होत आहे. दरम्यान, महाराष्ट्रातील आगामी पालिका व पंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी छत्रपती संभाजीनगर येथे महत्त्वपूर्ण बैठक घेतली. या बैठकीत राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये भाजपने दमदार कामगिरी करावी, यासाठी संघटन मजबूत करण्याचे आदेश देण्यात आले. भाजप कार्यकर्त्यांमध्ये सध्या उत्साहाचे वातावरण असून, बीड नगरपरिषदेत पुन्हा एकदा भाजपचा भगवा फडकवण्याचा संकल्प करण्यात आला आहे, असे भाजपा बीड जिल्हा सरचिटणीस गणेश लांडे यांनी सांगितले.

## मांजरसुंबा येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी उत्सव उत्साहात संपन्न

**मांजरसुंबा । प्रतिनिधी**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी उत्सव आज मांजरसुंबा येथे अत्यंत उत्साहात संपन्न झाला. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून बीड जिल्हा कार्यवाह अतुल घोरड उपस्थित होते. या वर्षी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला शंभर वर्ष पूर्ण होत असल्याने उत्सवात स्वयंसेवकांमध्ये विशेष आनंद व प्रेरणा दिसून आली.

उत्सवाच्या प्रारंभी मांजरसुंबा येथे सघोष पथसंचलन करण्यात आले. त्यानंतर शस्त्रपूजन सोहळा संपन्न झाला. समारोपाचा कार्यक्रम राधाकृष्ण मंदिर संस्थान, मांजरसुंबा येथे पार पडला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे महंत गपाट महाराज या यांची उपस्थिती लाभली.यावेळी प्रमुख वक्ते अतुल घोरड म्हणाले राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही केवळ संघटना नसून संपूर्ण हिंदू समाजाचे संघटन आहे, संघ हिंदू समाजाचे संघटन नसून हिंदू संघटन आहे.संघाच्या स्थापनेपासून आजपर्यंत समाजाच्या सहकार्यामुळेच हा शताब्दी प्रवास यशस्वी झाला आहे. परंतु हे कार्य अखंड व अविरत चालणारे आहे. मातृभूमीला परम वैभवसंपन्न करण्यासाठी सर्वांनी मिळून कार्य करणे आवश्यक आहे.ते पुढे म्हणाले –

इतिहास साक्षी आहे, जेव्हा जेव्हा हिंदू समाजात आत्मग्लानी किंवा फूट पडली तेव्हा भारतावर परकीय आक्रमणे यशस्वी ठरली. म्हणूनच सामर्थ्यवान, बलसंपन्न आणि राष्ट्रहित सर्वोपरी मानणाऱ्या समाजाच्या आधारावरच भारत पुन्हा एकदा परम वैभवसंपन्न बनेल.

भारत जगावर राज्य करण्यासाठी नव्हे, तर विश्वकल्याणासाठी विश्वगुरू बनत आहे. या ध्येयासाठी प्रत्येकाने 'पंच परिवर्तन' जीवनात आणले पाहिजे – 'स्व'चा बोध, सामाजिक समरसता, नागरिक कर्तव्य पालन, पर्यावरणपूरक जीवनपद्धती आणि कुटुंब प्रबोधन.'या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने स्वयंसेवक, नागरिक व माता–भगिनींनी उपस्थित राहून शिस्तबद्ध व देशभक्तिपूर्ण वातावरणात उत्सवाचा आनंद लुटला.

## लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाची नगराध्यक्षपदासाठी जोरदार एंट्री ?

### अंबाजोगाईच्या राजकारणात नवा चेहरा ; शिवसेनेचे गजानन मुडेगांवकर यांची उमेदवारी चर्चेत !

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**



लोकशाही व्यवस्थेतील चौथास्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारितेतील एक धडाडीचे नाव गजानन मुडेगांवकर हे राजकारणात सक्रीय आहेतच पण आता शिवसेने (शिंदे गट)कडून त्यांनी नगराध्यक्ष पदासाठी पक्षाकडे उमेदवारी मागितली असून सर्वसान्याचा उमेदवार म्हणून त्यांची जोरदार चर्चा सध्या अंबाजोगाई शहरात रंगली असून त्यांचे नाव चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. सामाजिक भान, जनतेशी थेट नाळ जोडलेली आणि निर्भीड पत्रकारितेच्या माध्यमातून अनेक वर्षे सामान्य नागरिकांचे प्रश्न मांडणारे गजानन मुडेगांवकर आता थेट नगराध्यक्ष म्हणून जबाबदारी स्विकारण्याच्या विचारात असल्याचे दिसून येत आहे.

अंबाजोगाई नगर परिषद निवडणुकीतील नगराध्यक्ष पदाची उमेदवारी जाहीर होणे एक महत्त्वाचा भाग असून ते पायाभूत सुविधा, रस्ते, ड्रेनेज व्यवस्था, आणि युवकांसाठी रोजगाराच्या संधी यांसारख्या प्रश्नांवर नेहमीच आवाज उठवितात. रस्ते, पाणी, पथदिवे आणि सर्वांगिण विकास अशा महत्वपुर्ण गोष्टींवर काम करणारा लोकप्रतिनिधी म्हणून खऱ्या अर्थाने काम करणाऱ्या व्यक्तीची गरज भासत होती, आणि त्यामुळेच मुडेगांवकर यांच्या नावाला जनतेत चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे. राजकारण करत असताना शिवसेनेची शिकवण ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या विचारांशी बांधील राहून जनते सोबत असलेला त्यांचा संपर्क,त्यांच्या महत्वपुर्ण प्रश्नांवर घेतलेली ठाम भूमिका, वेळोवेळी केलेला पाठपुरावाआणि कार्यक्षम नेतृत्व यामुळे गजानन मुडेगांवकर नगराध्यक्ष पदासाठीच्या निवडणुकीत चर्चेचा विषय ठरत आहे. मुडेगावकर यांनी अनेक वर्षे शहरप्रमुख म्हणुन शहरात संघटन केले आहे तर स्वा.रा.ती रुग्णालय अभ्यागत मंडळावर असल्याने अनेक नागरिकांच्या अडचणी सोडवल्या आहेत तसेच कामगार संघटनेचा पाठिंबा असल्याने त्यांचा शहरातील सर्वसामान्य ते ज्येष्ठां पर्यंतचा जन संपर्क दांडगा मानला जात आहे

स्थानिक नागरिक त्यांच्या उमेदवारीला पाठिंबा दर्शवत, आम्हाला काम करणारा नेता हवा, केवळ प्रसिद्धीचा हव्यास नसलेला नाही, असे स्पष्ट मत व्यक्त केले आहे. राजकारणात नव्या दमाच्या आणि स्वच्छ प्रतिमेच्या लोकांना संधी देण्याची वेळ आली आहे, असे मतही काही ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त करून गजानन मुडेगांवकर यांचे स्वागत केले आहे. आता त्यांच्या उमेदवारी जाहीर होण्याच्या प्रक्रिये कडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

## राज्यात 15 ऑक्टोबरपासून वादळी पावसाचा अंदाज

**मुंबई । प्रतिनिधी**



गेल्या काही दिवसांपासून राज्यातील हवामान पूर्णपणे कोरडे आहे आणि नैऋत्य मान्सूनने राज्यातून निरोप घेतला आहे. मात्र, १५ ऑक्टोबर पासून राज्यातील हवामानात परत एकदा बदल अपेक्षित असून किमान १८ ऑक्टोबरपर्यंत विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात ढगाळ हवामान आणि दुपारनंतर वादळी पाऊस अपेक्षित आहे.

सध्याच्या अंदाजानुसार वादळी पावसाची सर्वाधिक शक्यता आणि प्रमाण हे विदर्भ आणि मराठवाड्यात असू शकते, जिथे या दरम्यान अनेक भागांमध्ये ढगाळ हवामान अथवा वादळी पावसाची शक्यता राहील. तुलनेत खानदेश आणि मध्य महाराष्ट्रात विखुरलेल्या स्वरूपाचा वादळी पाऊस पडू शकतो.

शेतकऱ्यांनी हवामानाच्या स्थितीनुसार नियोजन करावे आणि काढणी केलेल्या पिकांना वादळी पाऊस आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावे, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

## फ्रेशर्स पार्टीमध्ये नाचताना धक्का लागला, त्याचक्षणी जुन्या वादाच्या रागातून बेदम मारहाण; कोमात असलेल्या सुरजचा हृदयद्रावक अंत

**लातूर । प्रतिनिधी**



लातूर जिल्ह्यात दिवसेंदिवस गुन्हेगारी वाढत चालली आहे. क्षुल्लक कारणावरून जीवे मारण्याचे प्रकार घडताना दिसून येत आहेत. असाच एक धक्कादायक प्रकार लातूरच्या जीवनरेखा महाविद्यालयातील फ्रेशर पार्टीमध्ये पाहायला मिळाला. नाचताना एकमेकांना धक्का लागला आणि यावरून वाद झाला. यामध्ये सुरज शिंदे नावाच्या विद्यार्थ्याचा मृत्यू झाला आहे. लातूर येथील एमआयडीसी परिसरात असलेल्या महिला बीसीए महाविद्यालयात डीएमएलटी प्रथम वर्षामध्ये शिक्षण घेणाऱ्या दोघा विद्यार्थ्यांवर चौघा तरूणांनी काठीने हल्ला केला. यात सुरजला गंभीररित्या जखमी केलं असून तो कोमामध्ये होता. त्याच्यावर एका खासगी रूग्णालयात उपचार चालू असताना आज त्याची प्राणज्योत मालवली आहे.

वरील कॉलेजमध्ये फ्रेशर्स पार्टी आयोजीत करण्यात आली होती. या दरम्यान सर्व विद्यार्थी या पार्टीत सहभागी झाले होते. त्यानंतर या महाविद्यालयाशेजारीच रिहान शेख आणि इरफान पठाण (दोघेही रा. चौधरी नगर, लातूर) व त्यांच्यासोबत इतर दोघेजण यांनी विद्यार्थी सुरज धोंडीराम शिंदे (रा. प्रगती नगर, लातूर) यास काठीने मागील भांडणाची कुरापत काढून गंभीररित्या जखमी केलं. सुरज शिंदे हा कोमात होता त्याचा उपचारादरम्यान लातूरच्या एका खासगी दवाखान्यात मृत्यू झाला. या प्रकरणात एमआयडीसी पोलिस स्टेशनमध्ये सुरज शिंदे याचा मित्र आदित्य याने दिलेल्या तक्रारीवरून रिहान शेख आणि इरफान पठाण यांच्या विरोधात हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी एमआयडीसी पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये किरकोळ कारणासाठी हाणामारीचा असा गंभीर प्रकार होणे यावरून लातूर शहरात शिक्षणासाठी असलेल्या पाल्यांविषयी पालकांमध्ये चिंता व्यक्त करण्यात येत आहे.

## अय्य...इथे लघुशंका करु नको; राग आल्याने दिवसाढवळ्या बेदम मारहाण, तरुणाचा मृत्यू

**नागपूर । प्रतिनिधी**




मद्यधुंद अवस्थेत शिवीगाळ केल्याने युवकाचा खून करण्यात आला. ही घटना खापरखेडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील लोनखैरी येथे घडली. अमोल अंकुश गजभिये (वय ३० रा. रिंगनाबोडी, काटोल), असं मृतकाचं नाव आहे. खापरखेडा पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून मारेकऱ्याला अटक केली आहे. उमेश उर्फ सोनू अमृत गजघाटे (वय ४५ रा. लोनखैरी) असं अटकेतील मारेकऱ्याचं नाव आहे. अमोल हा सिध्दार्थ प्रभाकर गजभिये (वय २८ ,रा. लोनखैरी) याचा मित्र होता.

पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार, गुरूवारी दुपारी सिद्धार्थ, अमोल, प्रवीण डेहनकर व गौतम बागडे हे कोंढाळीहून लोनखैरीला आले. दरम्यान, त्यांनी कोराडीत दारू प्यायली. त्यानंतर ते घरी गेले. लघुशंकेसाठी अमोल हा घराबाहेर गेला. तो उमेश याच्या घरासमोर लघुशंका करीत होता. उमेश यांनी त्याला लघुशंका करण्यास मनाई केली. अमोलने उमेशला शिवीगाळ करायला सुरूवात केली. उमेश संतापला. त्याने अमोल याला मारहाण केली. जखमी अवस्थेत अमोल खाली पडला. दरम्यान, एका महिलेने सिद्धार्थला अमोल जखमी असल्याबाबत माहिती दिली. सिद्धार्थ व त्याचे मित्र तेथे गेले. त्यांनी जखमी अमोल याला खासगी हॉस्पिटलमध्ये दाखल केले. उपचारानंतर डॉक्टरांनी अमोल याला सुटी दिली. अमोल घरी गेला. काल शनिवारी अमोल याची प्रकृती खालावली.

नातेवाइकांनी त्याला मेडिकल कॉलेज हॉस्पिटलमध्ये दाखल केलं. डॉक्टरांनी तपासून अमोल याला मृत घोषित केलं. उमेशने खापरखेडा पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून उमेशला अटक केली. पोलिसांनी त्याला न्यायालयात हजर केले. न्यायालयोन त्याची दोन दिवसांसाठी पोलिस कोठडीत रवानगी केली.

## पुण्याला संपूर्ण महाराष्ट्रासह भारतातील पहिल्या क्रमांकाच्या IT पार्कला जोडणारा सर्वात मोठा प्रकल्प; ६ महामार्गांना डायरेक्ट कनेक्ट होणारा रिंग रोड

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे हे शहर हे महाराष्ट्रातील झपाट्याने विकसीत होणारे शहर आहे. हिंजवडी आयटी पार्क, चाकण MIDC तसेच अनेक मोठ्या औद्योकिक वसाहतींमुळे पुणे आर्थिक उलाढालीचे केंद्र देखील बनले आहेत. शहराचा विस्तार होत असताना समस्या देखील वाढत आहेत. यापैकी महत्वाची समस्या आहे ती वाहतूक कोंडीची समस्या. पुणे शहारलगत अनेक महामार्ग आहेत. मात्र, वाहनचालक वाहतूक कोंडीत अडकतात. पुण्याची वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी रिंग रोंड हा सर्वात मोठा प्रकल्प राबवला जाणार आहे. हा रिंग रोड पुण्यातून जाणाऱ्या सहा महामार्गांना जोडला जाणार आहे.




पुण्यातील वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी पुणे रिंग रोड प्रकल्प उभारला जाणार आहे. आतील आणि बाहेरील हा पुणे शहराभोवती बांधला जाणारा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. हा रिंग रोड पुणे–मुंबई, पुणे–नाशिक, पुणे–सोलापूर, पुणे–बंगळूर आणि पुणे–अहमदनगर यांसारख्या महत्त्वाच्या महामार्गांना जोडले जाणार आहे. या रिंग रोडमुळे शहरातील वाहतूक कोंडी कमी होईल आणि शहराचा विकास सुलभ होईल. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत रिंग रोडचे काम करत आहे, तर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ बाह्य रिंग रोडचे काम करत आहे.

पुण्यातील वाढत्या वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी तसेच शहरात प्रवेश न करता इतर महामार्गांवर जोडण्यासाठी एक पर्याय उपलब्ध करण्यासाठी हा रिंग रोड उभारण्यात येत आहे. या रिंग रोड मुळे औद्योगिक आणि आर्थिक विकासाला गती मिळणार आहे. इनर रिंग रोड हा झचउ्ठऊ अर्थात पुणे शहराच्या आसपास बांधला जात आहे, ज्यामुळे वाहतूक सुलभ हणार आहे. आऊटर रिंग रोड हा चडठऊ च्या माध्यमातून बांधला जाणार आहे. हा एकूण १३६ किमी लांबीचा रस्ता शहराभोवती ८३ गावांमधून जाईल. सहा महामार्गांना जोडणार – पुणे रिंग रोड हा एकूण सहा माहमार्गांना जोडला जाणार आहे. पुणे–मुंबई (NH 4), पुणे–नाशिक (NH५०), पुणे–सोलापूर (NH ९), पुणे–बंगळूर आणि पुणे–अहमदनगर हे मुख्य महामार्ग रिंग रोडला जोडले जातील. २०२१ मध्ये हा प्रकल्प मंजूर करण्यात आला. प्रकल्पाचे काम सुरू आहे. २६,८३१ कोटी रुपयांचा हा प्रकल्प आहे. भूसंपादनाची प्रक्रिया बऱ्याच अंशी पूर्ण झाली आहे.

हा रिंग रोड पुण्याची वाहतूक कोंडीची समस्या सोडवणार आहे. रिंग रोडमुळे शहरात प्रवेश न करता लांब पल्ल्याची वाहतूक करणे सोपे होणार आहे. शहरातील जमिनीच्या किमतीत वाढ होणार आहे. कारण कनेक्टिव्हिटी सुधारल्याने नवीन व्यावसायिक विकासाला चालना मिळणार आहे. थोडक्यात हा रिंग रोड पुण्याला महाराष्ट्रातील सर्वात महत्वाच्या महामार्गांना जोडणारा आहे. सर्वात महत्वाचे म्हणेज पुणे–बंगळूर महामार्गाला हा रिंग रोड जोडला जाणार असल्याने भारतातील पहिल्या क्रमांकाच्या खढ पार्कला डायरेक्ट कनेक्टिव्हिटी मिळणार आहे.

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● सोमवार, दि. १३ ऑक्टोबर २०२५ ● पान ४

## थोडक्यात...

### मराठवाडा पदवीधर मतदार नोंदणी मदत केंद्र सुरु करण्यात आले असुन २०२२ पुर्वीच्या सर्व पदवीधारकानी मतदार नाव नोंदणी करुन घ्यावी : गणेश बजगुडे



**बीड । प्रतिनिधी**

औरंगाबाद (छत्रपती संभाजी नगर) पदवीधर मतदार संघ निवडणुकीच्या अनुषंगाने मराठवाडा पदवीधर विभागाची मतदार नोंदणी सुरु झालेली असुन दिनांक ०१/ ११/ २०२२ पुर्वी पदवीधर (डिग्री) असलेले किंवा ३ वर्षाची पदविका (डिप्लोमा) असलेल्या मराठवाडा विभागातील छत्रपती संभाजी नगर, जालना, बीड, धाराशिव, लातूर, परभणी, नांदेड, हिंगोली या सर्व जिल्ह्यातील पदवीधर मतदार बंधु भगिनींनी मतदार नाव नोंदणी करुन घ्यावी. मागील निवडणुकीत नोंदणी केलेली असेल किंवा मतदान देखील केलेले असेल तरी देखील नव्याने नोंदणी करावी लागते यासाठी आपली डिग्री, किंवा डिग्रीचा शेवटच्या वर्षाचा मार्कमेमो, आधारकार्ड, मतदान कार्ड, फोटो आदी कागदपत्रासह पदवीधर मतदार संघासाठी असलेला नाव नोंदणी अर्ज भरुन संबंधित तहसील कार्यालयात जमा करावेत किंवा बीड तालुका काँग्रेस कमिटी व शिवक्रांती युवा परिषदेच्या वतीने सुरु केलेल्या मराठवाडा पदवीधर मतदार नोंदणी मदत केंद्र, बजगुडे निवास, खडकपुरा बीड. संपर्क - ९४२११२८१०१२ याठिकाणी जमा करुन तत्काळ नावनोंदणी करावी असे आवाहन शिवक्रांती युवा परिषदचे अध्यक्ष तथा काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील यांनी केले आहे.

### दिंद्रुडचा दक्षराज कटारे विभागीय जलतरण स्पर्धेत सुवर्णपदकाचा मानकरी

**दिंद्रुड । प्रतिनिधी**



दिंद्रुड येथील जलतरणपटू दक्षराज कटारे याने छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झालेल्या विभागीय जलतरण स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून सुवर्ण पदक मिळवले. सलग दुसऱ्यांदा राज्यस्तरीय स्पर्धेसाठी तो पात्र झाला आहे. दक्षराज माजलगाव येथील सिंदफणा पब्लिक स्कूलचा विद्यार्थी असून सुवर्णपदकाचा मानकरी झाल्याबद्दल त्याचे सर्वस्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. नुकत्याच छत्रपती संभाजीनगर येथे विभागीय जलतरण स्पर्धा पार पडल्या. यात दक्षराज कटारे याने चौदा वर्षाखालील गटातील मुलांच्या संघात सर्वोत्कृष्ट कामगिरी केली. यामध्ये सुवर्णपदकाचा मानकरी ठरलेल्या दक्षराज याची लातूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ५० मिटर बटरफ्लाय, ४|१०० मिटर फ्रिस्टाईल रिले,१९ वर्षाखालील वॉटर पोलो, ४|४०० मिडले रिले या जलतरण स्पर्धेसाठी तो पात्र ठरला आहे. दक्षराज कटारे यास मार्गदर्शन करणारे सिंदफणा पब्लिक स्कूल चे प्राचार्य शेख अन्वर, क्रीडा शिक्षक सचिन मंजुळे , दीपक माने , पुरुषोत्तम सोळंके, वैशाली सोळंके या सर्वांचे मार्गदर्शन लाभले, दिंद्रुड येथील डॉ. सोनाजीराव रांजवण माध्यमिक विद्यालय दिंद्रुड येथील क्रिडा शिक्षक ज्ञानोबा कटारे यांचा दक्षराज कटारे हा मुलगा आहे. त्याला जलतरणाचा अभ्यास व सराव देण्यासाठी ज्ञानोबा कटारे यांचा सिंहाचा वाटा आहे. त्याच्या या निवडीमुळे त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### मोफत नेत्र तपासणी शिबिर – १३ ऑक्टोबर २०२५ रोजी आनंद ऋषीजी हॉस्पिटल, बीड

**बीड । प्रतिनिधी**

उद्योगपती माननीय विजयराज हेमराजजी बंब (बीड) यांनी भगवान महावीर यांच्या शिकवणीप्रमाणे मनुष्याने उपवासाद्वारे आत्मशुद्धी करावी या संदेशाचा अंगीकार करून सलग आठ दिवस निरंकार उपवास (फक्त पाण्यावर) केले आहेत. या तपस्येचा सामाजिक उपयोग साधावा या उद्देशाने बंब परिवार, बीड यांच्या वतीने नागरिकांच्या आरोग्य सेवेसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर सोमवार, दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत, आनंद ऋषीजी हॉस्पिटल, जालना रोड, शाहू बँकेच्या बाजूला, बीड येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात अनुभवी नेत्रतज्ज्ञांमार्फत डोळ्यांची तपासणी केली जाणार असून, विशेषतः मधुमेह रुग्णांनी डोळ्यांची नियमित तपासणी करून घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे. बंब परिवार, बीड यांच्या वतीने सर्व नागरिकांना विनंती करण्यात येते की, या मोफत नेत्र तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा आणि आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी.

### विद्यार्थी शिक्षक पालक मेळाव्याला उपस्थित राहावे : प्राचार्य डॉ. खाकरे

**चौसाळा । प्रतिनिधी**

चौसाळा येथील कला व विज्ञान महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षात आयोजीत केलेल्या मेळाव्याला दि.१३/१०/२०२५ सोमवार सकाळी ११:०० वाजता नवगण शिक्षण संस्थेचे सचिव मा.डॉ.योगेश भैया क्षीरसागर व डॉ. सारिका ताई क्षीरसागर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये होणाऱ्या मेळाव्याला महाविध्यालयाच्या प्रवेशित विध्यार्थ्यांच्या पालक -विद्यार्थी व आजी-माजी विद्यार्थी आणि पदाधिकाऱ्यांनी बहुसंखेने उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. पंडितराव खाकरे यांनी केले. चौसाळा परिसरातील पालकांनी उपस्थित राहून आपल्या पाल्याच्या आणि महाविद्यालयाच्या प्रगतीचा लेखा जोखा, तसेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासात महाविध्याल्याचे योगदान, समजून घ्यावे.काही अडी-अडचणी,प्रश्न असतील तर त्या सोडवण्यासाठी सूचना कराव्यात महाविध्याल्ययाच्या क्रीडा,सांस्कृतिक व अन्य क्षेत्रात नैपुण्य दाखवलेल्या गुणवंत विध्यार्थ्याचा सत्कार या वेळी करण्यात येणार असून या मेळाव्याची तयारी पूर्ण झाली असल्याची माहिती,महाविद्यालयाच्या वतीने देण्यात आली आहे.

### सिंदफणा पब्लिक स्कूलच्या जलतरणपटूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**विभागीय स्पर्धेत पाच सुवर्णपदकासह उत्कृष्ट कामगिरी**



**माजलगाव । प्रतिनिधी**

विद्याभुवन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंदफणा पब्लिक स्कूल, माजलगाव येथील जलतरणपटूंनी संभाजीनगर येथे झालेल्या विभागीय जलतरण स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत पाच सुवर्णपदके जिंकली आहेत. तसेच विभागीय पातळीवरील ही स्पर्धा सलग तिसऱ्या वर्षी जिंकून हॅट्रिक केली आहे. या उल्लेखनीय कामगिरीमुळे शाळेच्या विद्यार्थ्यांची लातूर येथे १५ ते १८ ऑक्टोबर दरम्यान होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय जलतरण स्पर्धेसाठी निवड झाली असून सर्व स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. ▶ उर्वरित पान २ वर

## जयभवानीच्या कार्यक्षेत्रातील नोंदणीकृत सर्व उसाचे गाळप करण्यास आम्ही कटिबद्ध :अमरसिंह पंडित

**माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत जयभवानीचा ४३ वा बॉयलर प्रदिपन समारंभ संपन्न**



**● जयभवानीच्या साखरेची गोडी जगभरात पसरो : ह.भ.प. महादेव महाराज**

यावेळी शुभेच्छापर आशीर्वाद देताना ह. भ. प. महादेव महाराज म्हणाले की साधू संतांचे प्रेम आणि आशीर्वाद शिवाजीराव (दादा) पंडित परिवाराला मिळालेला आहे, दादांनी सामान्य माणसाला सामाजिक प्रतिष्ठा आणि प्रगती कशी मिळेल याचा विचार केला. एकमेका साहाय्य करू या सहकाराचा मंत्र प्रत्यक्षात आचरणात आणून जयभवानी साखर साखर कारखान्याची उभारणी केली. त्यामुळे अनेकांच्या घरात, शेतकऱ्यांच्या जीवनात प्रगती आली. सामान्य माणूस आज जयभवानीकडे सहकारी साखर कारखान्याकडे कामधेनू म्हणून पाहत आहे. सामाजिक कार्यात बरोबरच परमार्थिक काम करताना शिवछत्र परिवारांनी कधीही कुठेही दुजाभाव केला नाही. दादांची पुढची पिढी देखील दादांचा वारसा सक्षम पुणे पुढे घेऊन जात असताना समाजविधायक उपक्रम त्यांच्याकडून राबवले जात आहेत. जयभवानीच्या साखरेची गोडी जगभरात पसरो अशा शुभेच्छा त्यांनी यावेळी दिल्या.

**गेवराई । प्रतिनिधी**

जयभवानी सहकारी साखर कारखाना कार्यक्षेत्रात १३ ते १४ लाख मेट्रीक टन ऊस उपलब्ध आहे. त्यापैकी कार्यक्षेत्रातील १४६५६ हेक्टर क्षेत्राची नोंद कारखान्याकडे झालेली असून अंदाजे १० ते ११ लाख मेट्रिक टन ऊस गाळपास उपलब्ध होणार आहे. कारखान्याने चालू गळीत हंगामात ९ लाख मेट्रीक टन ऊस गाळपाचे व सरासरी ११ टक्के साखर उतार्याचे उदिष्ट ठरवीले असून कार्यक्षेत्रातील नोंदणी झालेल्या सर्व उसाचे शंबर टक्के गाळप करण्यास आम्ही कटिबद्ध आहोत असे प्रतिपादन जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी केले. २०२५-२६ च्या गळीत हंगामासाठी जयभवानी सहकारी कारखान्याचे बॉयलर प्रदिपन करताना ते बोलत होते.

जयभवानी सहकारी साखर कारखान्याच्या २०२५-२६ च्या ४३ व्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्नि प्रदिपन समारंभ रविवार दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ रोजी श्रीक्षेत्र चाकरवाडी संस्थानचे मठाधिपती ह.भ.प. महंत महादेव महाराज यांच्या हस्ते व कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव (दादा)पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित, व्हा. चेअरमन भाऊसाहेब नाटकर, बाजार समितीचे सभापती जगन्नाथ काळे, उपसभापती श्रीहरी पवार यांच्यासह संचालक सर्वश्री जगन्नाथ शिंदे, आप्पासाहेब गव्हाणे, सुनिल पाटील, श्रीराम आरगडे, राजेंद्र वारंगे, संदीपान दातखीळ, जगन्नाथ दिवाण, कुमारराव ढाकणे, शरद चव्हाण, भिमराव मोरे, रावसाहेब देशमुख, गणपत नाटकर, जगन्नाथ काळे, बाबुराव काकडे, रहेमतुल्ला पठाण, साहेबराव चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी ह.भ.प. महादेव महाराज आणि संचालक सुनील पाटील यांच्या हस्ते विधीवत पूजा करून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बॉयलर प्रदिपन करण्यात आले. वेळेत बॉयलरचे काम पूर्ण केल्याबद्दल घनश्याम कादे यांना पाच ▶ उर्वरित पान २ वर

## ज्या शेतकऱ्यांनी पिकवलेले अन्न एवढे वर्षे खाल्ले त्यांच्या उध्दारासाठी यापुढे काम करणार: मयंक गांधी

**ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने मौजे बोरखेड व तेलसमुख येथे पुरग्रस्त शेतकऱ्यांना किराणा किटचे वाटप**



**परळी वै. । प्रतिनिधी**

शेतकरी राबराब राबतात, शेतात घाम गाळतात आणि त्यानंतर त्यांनी पिकवलेले अन्नधान्य जगाला जगवते, म्हणूनच त्याला जगाचा पोशिंदा म्हटले जाते. मीही आयुष्याची एवढी वर्षे शेतकऱ्यांनी पिकवलेले अन्नधान्य खाल्ले आहे. या ऋणातून उतराई होण्यासाठी मी उरलेले आयुष्य खर्च करणार असून, शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी काम करणार असल्याचे प्रतिपादन ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांनी केले. परळी वैजनाथ तालुक्यातील मौजे बोरखेड तसेच तेलसमुख येथे पुरपरिस्थितीमुळे नुकसान झालेल्या शेतकरी कुटूंबांना किराणा किटचे वाटप करण्यात आले, याप्रसंगी ते बोलत होते. परळी वैजनाथ तालुक्यातील मौजे बोरखेड तसेच तेलसमुख येथे पुरग्रस्त शेतकरी कुटूंबांना ग्लोबल विकास ट्रस्टकडून किराण किटचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी ▶ उर्वरित पान २ वर

**● ३ हजारपेक्षा जास्त शेतकरी कुटूंबांना किराणा किटचा मिळतोय लाभ!**

ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. शेतातील पिके वाहून गेली, पिकांसोबत शेतातील मातीही वाहून गेल्याने पुढील किमान तीन वर्षे त्या शेतीतून उत्पन्न मिळू शकणार नाही. अशा अवस्थेत शेतकऱ्यांनी जगायचे कसे? असाच मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. खूप काही नाही, परंतू दसरा आणि दिवाळी सण तरी त्यांना आनंदात साजरे करता यावेत या हेतूने ग्लोबल विकास ट्रस्टकडून मदतीचा हात पुढे करण्यात आलेला आहे. २२ प्रकारच्या जीवनावश्यक वस्तू असलेल्या तीन हजारपेक्षा जास्त किराणा किटचे १६ गावांमध्ये वाटप करण्यात येत आहे.

### १४ वर्षाच्या रितेश गवळीने आई - बहिणीसह पाच जणांचे वाचवले प्राण...

## गेली वीस दिवसापासून रुग्णालयामध्ये देतोय मृत्यूशी झुंज

**• स्वयंसेवी संस्था व दानशूर व्यक्तींनी मदती साठी पुढे यावे**

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**





अंबाजोगाई तालुक्यातील घोलपवाडी या गावातील रितेश मारोती गवळी याने आई बहिणीसह पाच जणांचे प्राण वाचवले. घोलपवाडी गावाजवळील एका तलावापाशी आई बहीण व इतर काही व्यक्ती धुणं धुवत असताना पाय घसरून पडल्याने एकमेकाला वाचवण्यासाठी एकमेकांनी प्रयत्न केला पण कोणालाही पोहता येत नसल्याने सगळे पाण्यामध्ये घटाळ्या खात होते रितेश गवळीने आरडाओरडा करून सुद्धा कोणीही मदतीला आले नाही त्यामुळे स्वतः पाण्यामध्ये उडी घेतली. रितेश गवळी हा बालक वय वर्षे १४ सोमेश्वर विद्यालय घाटनांदुर येथे शिक्षण घेतो त्याने कोणत्याही परिस्थितीचा विचार न करता आई-बहीण व इतर तीन जणांचे पाण्यामध्ये उडी घेऊन प्राण वाचवले पण हे करत असताना तो स्वतःला मोठी जोखीम झाली गेली वीस दिवसापासून स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय रुणालय अंबाजोगाई मृत्यूशी झुंज देत आहे. रितेश गवळीने आई बहिण व इतर तिघांचे प्राण वाचवले त्याची झालेली परिस्थिती पाहून आईला असे वाटते मी जरी मेले असतो तरी चालले असते पण रितेश ला काही झाले नसते. रितेश गवळीचे वडील काही दिवसापूर्वी पॅरॅलिसिस झाल्यामुळे मृत अवस्थेमध्ये असल्यासारखे आहेत आई मजुरी करून कुटुंब चालवते यामध्ये रितेश ची परिस्थिती सध्याला तो गेली वीस दिवसापासून कोमा मध्ये आहे. पुढील उपचार करण्यासाठी आता त्याकडे पैसे नाही. सोमेश्वर विद्यालय घाटनांदुर ▶ उर्वरित पान २ वर

## बीडच्या सिंदफना नदीपट्ट्यातील पूर् बाधितांना पुण्याच्या पिंपरी चिंचवड माउंटेरिंग क्लबचा मदतीचा हात

**• अन्नधान्य किट व शालेय साहित्य वाटप**

**बीड । प्रतिनिधी**



अतिवृष्टी आणि पूर परिस्थितीमुळे बीड जिल्ह्यातील सिंदफणा नदीपट्ट्यातील शिरसमार्ग व हिंगणी हवेली गावातील पूरग्रस्तांना पिंपरी चिंचवड माउंटेरिंग क्लब च्या वतीने मदतीचा हात देण्यात आला आहे.. शिरसमार्ग गावातील ४० कुटुंबाला दिवाळीसाठी लागणारा संपूर्ण किराणा भेट देण्यात आला आहे. आज क्लबच्या सदस्यांच्या हस्ते या मदत किटचे वाटप करण्यात आले.. यावेळी प्रमुख उपस्थिती.. क्लबचे सदस्य माजी प्राचार्य हरिदास जोगदंड ,अविनाश पिंगळे खजिनदार ,शिवाजी शिंदे, सतीश बुर्डे ,अरुण बोरकर, संतोष उत्कर, जगन माळी, अभय जोगदंड,सुदर्शन शिंदे, पत्रकार सुरेश महाराज जाधव यांच्यासह गावातील शेकडो लोक उपस्थित होते.. बीडच्या गेवराई तालुक्यातील शिरसमार्ग गावाला सिंदफना नदीच्या महापुरामुळे मोठा तडाखा बसला आहे .शेकडो एकर शेती, माती आणि पिके उध्वस्त झाली आहेत. या शेतकऱ्याची व्यथा वृत्तवाहिनीच्या माध्यमातून पाहिल्यानंतर पुणे येथील पिंपरी चिंचवड माउंटेरिंग क्लबच्या सदस्यांनी मदत गोळा केली.. त्या मदतीचे आज शिरसमार्ग गावात वाटप करण्यात आले. मारुतीच्या मंदिरात ▶ उर्वरित पान २ वर